महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ No 10451 दिनांक: 11 NOV 2022

## सूचना

**विषय :-** महानिर्मिती जाहिरात क्र.०८/२०१९ व १०/२०१९ अन्वये ऑनलाईन परीक्षा लागू असणाऱ्या पदांकरीता ऑनलाईन परीक्षा दिनांक, ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेशपत्राची लिंक व माहितीपत्रक

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०८/२०१९
२) महानिर्मिती जाहिरात क्र.१०/२०१९
३) महानिर्मिती सूचना क्र.७६०५ दि.१८.०८.२०२२
४) महानिर्मिती सूचना क्र.७७८३ दि.२४.०८.२०२२

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०८/२०१९ अन्वये वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ, प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, सहाय्यक अनुदेशक, अनुदेशक, वाहनचालक नि-अग्नि यंत्रचालक, व्यवस्थापक (विवले), उप व्यवस्थापक (विवले),वरिष्ठ व्यवस्थापक (मासं),व्यवस्थापक (मासं) व उप व्यवस्थापक (मासं) तसेच महानिर्मिती जाहिरात क्र.१०/२०१९ अन्वये अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य), उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व सहाय्यक अभियंता (स्थापत्य) यांची पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीताची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

आता, वरील नमूद पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि.०२ व ०३ डिसेंबर २०२२ रोजी पार पाडण्यात येणार आहे. उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**ऑनलाईन परीक्षेकरीताच्या प्रवेशपत्राची लिंक** ↵

तसेच उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक** ↵

१) उमेदवारांना वरील ऑनलाईन परीक्षेकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पडताळणी / छाननी न करता बोलविण्यात येत आहे. तथापि, ऑनलाईन अर्जात नमूद केलेली कागदपत्रे /प्रमाणपत्रे भविष्यात जमा करण्याच्या प्रक्रिये दरम्यान सादर करणे तसेच सिध्द करण्याची जबाबदारी संपूर्णत: उमेदवाराची राहील. तसेच अर्जात नमूद माहिती उमेदवार सिध्द न करु शकल्यास अथवा खोटी आढळल्यास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यात उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) वरील ऑनलाईन परीक्षेत उमेदवाराच्या नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही.

३) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ नुसार सरळसेवा प्रवेशाव्दारे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पदांकरीता मागास प्रवर्गातून (Backward Class) अंतिम निवडी करीता एकूण गुणांपैकी किमान २०% गुण व खुल्या प्रवर्गातून (Open Category) अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान ३०% गुण मिळविणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कार्यकारी संचालक (मासं)**
**महानिर्मिती**